# महाराष्ट्र विधानसभा

**दुसरे अधिवेशन, २०२६**

**सन २०२६-२७ च्या पुरवणी मागण्यांवरील**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**मंगळवार, दिनांक ३० जून, २०२६**

## नगर विकास विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - ४१**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एफ-२**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२१७, नगरविकास**<br>**बाब क्रमांक: ७८, रूपये:- १६,८१,००,०००/-**<br>**डॉ. बाबासाहेब देशमुख** |
| (१) | १५३४ | १० | सांगोला नगरपरिषद हद्दीत असलेले श्री अंबिका माता मंदिर हे परिसरातील अत्यंत महत्त्वाचे श्रद्धास्थान असून येथे महाराष्ट्रासह शेजारील कर्नाटक राज्यातूनही मोठ्या प्रमाणावर भाविक दर्शनासाठी येत असतात. विशेषतः यात्रेच्या काळात आणि धार्मिक उत्सवांच्या वेळी हजारो भाविक येथे उपस्थित राहतात. मात्र मंदिर परिसरात येणाऱ्या भाविकांसाठी निवासाची योग्य व पुरेशी व्यवस्था उपलब्ध नसल्यामुळे भाविकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. अनेक भाविकांना मंदिर परिसरात किंवा शहरात तात्पुरत्या व अपुऱ्या सुविधांमध्ये मुक्काम करावा लागतो, त्यामुळे त्यांना गैरसोय सहन करावी लागते. यात्रास्थळाचा वाढता लौकिक आणि भाविकांची संख्या लक्षात घेता येथे सुसज्ज भक्तनिवास (धर्मशाळा) उभारणे अत्यंत आवश्यक आहे. अशा प्रकारचा भक्तनिवास उभारल्यास भाविकांना सुरक्षित व स्वच्छ निवासाची सोय उपलब्ध होईल तसेच धार्मिक पर्यटनालाही चालना मिळेल आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला फायदा होईल. सबब सांगोला नगरपरिषद हद्दीतील श्री अंबिका माता यात्रास्थळ परिसरात सुसज्ज भक्तनिवास उभारण्यासाठी राज्य शासनाने विशेष निधीची तरतूद करण्याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अमिन पटेल** |
| (२) | १५९७ | १० | मुंबई शहर आणि उपनगरातील मान्सूनपूर्व नालेसफाईची कामे अत्यंत असमाधानकारक पद्धतीने सुरू असल्याचे दिसून येत आहे. पावसाळा तोंडावर आलेला असतानाही कंत्राटदारांच्या निष्काळजीपणामुळे गेल्या ४० दिवसांत नालेसफाईची कामे केवळ १० ते ३० टक्क्यांच्या आसपास झाली आहेत. नाल्यांची खोली, रुंदी व गाळ काढण्याचे मोजमाप पारदर्शक पद्धतीने केले जात नसल्याच्या तक्रारी असून, कामे अपूर्ण असतानाही कंत्राटदारांना मोठ्या प्रमाणावर देयके अदा केली जात असल्याचे समोर आले आहे. कंत्राटदार व संबंधित यंत्रणेच्या अशा कारभारामुळे यंदाच्या पावसाळ्यात मुंबईत अनेक ठिकाणी पाणी साचून पूरपरिस्थिती |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | निर्माण होण्याची आणि जनजीवन विस्कळीत होण्याची तीव्र भीती निर्माण झाली आहे. या गंभीर समस्येवर शासनाने नालेसफाईची कामे वेळेत पूर्ण करण्याबाबत व ठोस उपाययोजना करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३) | १५९८ | १० | मुंबईतील प्रसिद्ध धर्मस्थळांपैकी एक असे हाजीअली दर्गा असणे, याठिकाणी मुंबई महाराष्ट्रासह सर्वधर्मीय हजारो भाविकांसोबत देश विदेशातून येणारे पर्यटक देखील दररोज भेट देत असणे. या भाविकांना / पर्यटकांना कोणत्याही असुविधेचा सामना करावा लागू नये आणि सदर ठिकाण हे एक चांगले धार्मिक पर्यटन स्थळ व्हावे या उद्देशाने हाजीअली दर्ग्याचे सौंदर्यीकरण होणे आवश्यक असणे, यासाठी मागील नऊ वर्षांपासून शासन स्तरावर सतत पाठपुरावा सुरु असणे. आजमितीसही या हाजीअली दर्ग्याच्या सौंदर्यीकरणाचे काम सुरूच असणे. त्यामुळे सदर कामाची स्थळपाहणी करीत हाजीअली दर्ग्याच्या सौंदर्यीकरणाचे काम लवकरात लवकर पूर्ण व्हावे अशी भाविकांसोबत पर्यटकांची देखील मागणी असणे, परिणामी भाविकांसोबत पर्यटकांमध्ये असलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना |
| (४) | १६०२ | १० | मुंबईमध्ये अनेक विभागात सतत वाहतूक कोंडी होत असणे, वाहनांची संख्या वाढत असल्याने वाहनतळ अपुरी पडत असणे, खास करून मुंबादेवी विधानसभा क्षेत्रात सतत गजबज असणे, वाहनकोंडीमुळे वाहनचालक तसेच नागरिक त्रस्त असणे, अशा वाहनकोंडीमध्ये रुग्णवाहिका अडकल्याने रुग्णांना देखील वेळेत उपचार मिळण्यासाठी विलंब होत असणे, वाहतूक कोंडीमुळे अनेकदा अपघात होंत असणे, वर्दळ आणि वाहनकोंडीमुळे ध्वनी प्रदूषण देखील मोठ्या प्रमाणात होत असल्याचे निदर्शनास येणे, स्थानिक नागरीकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असणे, परिणामी नागरिकांमध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना |
| (५) | १६०३ | १० | दक्षिण मुंबईमध्ये वारंवार वीज पुरवठा खंडित होण्याच्या घटना घडत असणे, वीज पुरवठा खंडित झाल्यावर अनेक तास नागरीकांना अंधारात राहावे लागणे, पाठकवाडी विद्युत बिघाड सुधारणा केंद्रामार्फत दक्षिण मुंबईमध्ये विद्युत बिघाड दुरुस्ती केली जाणे. पाठकवाडी केंद्रावर संपूर्ण दक्षिण मुंबईतून वीज पुरवठा खंडित होण्याच्या तक्रारी येत असल्याने या केंद्रावर अनेकदा ताण येत असणे, दक्षिण मुंबईमध्ये १२०० च्या आसपास विद्युत पुरवठा बिघाड संदर्भात तक्रारी साठलेल्या (Backlog) असणे, पावसाळा सुरु झाल्यास या तक्रारी वाढण्याच्या शक्यता असणे, ग्राहक सेवा केंद्रात तक्रारी नोंद करण्यासाठी संपर्क केला असता तिथे फोन न उचलल्याने नागरिकांमध्ये असंतोष निर्माण होणे विभागवार समस्या निवारण करण्यासाठी बिघाड दुरुस्ती केंद्राला सुमारे २ वर्षांचा कालावधी लागणे, या केंद्रावर कार्यरत कर्मचाऱ्यांची कमतरता असणे, बिघाड दुरुस्ती वाहनांची कमतरता असणे, बिघाड दुरुस्तीसंदर्भात |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | लागणाऱ्या साधनांची तसेच केबलची देखील मोठ्या प्रमाणात कमतरता असणे, विद्युत पुरवठा बिघाड झाल्यास मोठा जनप्रक्षोभ होण्याची शक्यता असणे, ओव्हरहेड केबलद्वारे अनेक ठिकाणी वीज पुरवठा करण्यात येणे, भविष्यात मोठी दुर्घटना घडल्यास येथे जीवितहानी होण्याची शक्यता असणे, असे घडल्यास बेस्ट प्रशासन व राज्य शासन जबाबदार असणे, परिणामी नागरिकांमध्ये असणारे असंतोषाचे वातावरण आणि नाराजीची भावना, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (६) | १६०६ | १० | मुंबई शहरात ४८ अपघात प्रवण क्षेत्रांची नोंद महापालिकेकडून होणे, रस्त्यांची दुरावस्था, असमतोल पृष्ठभाग, अपुरी पादचारी सुविधा, वेगवान वाहतूक यामुळे वारंवार गंभीर अपघात घडणे, केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाच्या निकषांनुसार तीन वर्षाच्या कालावधीत पाच गंभीर अपघात किंवा दहापेक्षा अधिक मृत्यू झालेल्या ५०० मीटरच्या रस्त्याच्या पट्ट्याला ब्लॅक स्पॉट म्हणून घोषित केले जाणे, मुंबईमध्ये वाढत्या वाहनांना सामावून घेत वेगवान वाहतुकीसाठी नवीन रस्ते, उड्डाणपूल उभारले जाणे, वारंवार अपघात घडणाऱ्या या अपघात प्रवण क्षेत्रांचा कायापालट करण्यासाठी त्यांच्या रचनेमध्ये बदल करणे आवश्यक असणे, त्याचप्रमाणे पादचाऱ्यांसाठी विशेष उपाययोजना राबविणे गरजेचे असणे, परिणामी सतत घडणारे अपघात, मृत्यू, व गंभीर जखमींची संख्या लक्षात घेता याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अभिजीत पाटील** |
| (७) | १६७७ | १०० | महाराष्ट्रातील सर्वात मोठे असणा-या उजनी धरणातून माढा शहरास पाणी पुरवठा करणारी पाईप लाईन असून सदरची पाईप लाईन अत्यंत खराब झालेली असल्याने माढा शहरास सुरळीत पाणी पुरवठा होण्याकरिता ती दुरुस्ती करणे व नवीन पाईप लाईन करण्यासाठीच्या प्रस्तावाची नस्ती मंत्रालय स्तरावर प्रलंबित असणे, अदयाप कोणतीच कार्यवाही न होणे, सदरची पाईप लाईन दुरुस्ती व नवीन करण्यासाठी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजनेअंतर्गत मंजूर असून प्रशासकीय मान्यतेकरिता प्रलंबित असणे, याकडे शासनाचे तात्काळ लक्ष घालून माढा शहराला पाणी पुरवठा करणा-या पाईप लाईनची दुरुस्ती करुन व नवीन पाईप लाईन करणेसाठीचा प्रलंबित प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. संजय मेश्राम** |
| (८) | १५४३ | १० | नागपूर जिल्ह्यातील उमरेड नगर परिषद कार्यक्षेत्रात दिव्यांग बांधवांच्या विविध प्रलंबित मागण्यांकडे प्रशासनाकडून सातत्याने दुर्लक्ष होत असल्याने दिव्यांग बांधवांनी नगर परिषद कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन सुरू केलेले आहे, गेल्या |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | अनेक महिन्यांपासून दिव्यांग समाज भवनाचे बांधकाम, व्यवसायासाठी आवश्यक जागा उपलब्ध करून देणे तसेच दिव्यांग कल्याण निधीची प्रभावी अंमलबजावणी याबाबत वारंवार निवेदने देऊनही कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसणे, शासन निर्णयानुसार दिव्यांग कल्याणासाठी राखीव असलेल्या ५ टक्के निधीचा योग्य व पारदर्शक वापर न झाल्याचा आरोप संबंधित दिव्यांग बांधवांकडून करण्यात आलेला असणे, तसेच निधीचा लाभ प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत पोहोचत नसल्याच्या तक्रारी प्रलंबित असणे, नगर परिषद प्रशासनाकडून केवळ आश्वासने देऊन प्रश्न लांबविण्यात येत असल्याने दिव्यांग बांधवांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झालेला असणे, तसेच उपजीविकेच्या साधनांचा अभाव असल्यामुळे त्यांना गंभीर अडचणींचा सामना करावा लागत असणे; या पार्श्वभूमीवर दिव्यांग समाज भवनाचे तातडीने बांधकाम सुरू करणे, दिव्यांगांसाठी व्यवसायिक जागा निश्चित करणे, दिव्यांग कल्याण निधीचा पारदर्शक व प्रभावी वापर सुनिश्चित करणे तसेच प्रलंबित मागण्यांवर कालबद्ध पद्धतीने निर्णय घेऊन आंदोलनावर तातडीने तोडगा काढणे आवश्यक आहे याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एफ-२**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२१७, नगरविकास**<br>**बाब क्रमांक: ८१, रूपये:- ४,०००/-**<br>**श्री. जयंत पाटील** |
| (९) | १६६९ | १०० | सांगली जिल्ह्यातील ईश्वरपूर हे शहर वेगाने वाढणारे शैक्षणिक आणि औद्योगिक हब बनले आहे. या शहराची लोकसंख्या वाढल्याने २०१४-१५ मध्ये 'महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान' अंतर्गत भुयारी गटार योजनेचे काम सुरू करण्यात आले होते. परंतु, वेगवेगळ्या तांत्रिक अडचणींमुळे आणि राष्ट्रीय हरित लवाद (NGT) मधील प्रकरणांमुळे नगरपरिषदेवर दंडात्मक कारवाईची नोटीस बजावण्यात आली आहे, ज्यामध्ये दररोज ५ लाख रुपये दंडाची तरतूद आहे. अध्यक्ष महोदय, नगरपरिषदेने या कामाचा सुधारित सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) एकूण १९ कोटी ८९ लाख ७० हजार २८८ रुपयांचा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून तांत्रिकदृष्ट्या मंजूर करून घेतला आहे. सदर योजनेचे काम पूर्ण करणे सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार आणि शहराच्या सार्वजनिक आरोग्य व स्वच्छतेच्या दृष्टीने अत्यंत निकडीचे आहे. नगरपरिषदेने आपल्या स्वतःच्या हिश्श्याची १०% रक्कम उभारण्याची तयारी ही ठरावाद्वारे दर्शवली आहे या भुयारी गटार योजनेच्या प्रस्तावास 'नगरोत्थान महाअभियान' अंतर्गत तातडीने प्रशासकीय मान्यता व आवश्यक निधी मंजूर करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एफ-२**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२१७, नगरविकास**<br>**बाब क्रमांक: ८२, रूपये:- १,०००,००,००,०००/-**<br>**श्री. अमित झनक** |
| (१०) | १६७४ | १० | मालेगाव (जि.वाशिम) नगर पंचायतीला स्वतंत्र इमारत नसल्याने प्रशासकीय कामात अत्यंत अडचणी येत असल्याने मालेगाव नगर पंचायतीची इमारत बांधकामासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया. |
| | | | **डॉ. बाबासाहेब देशमुख** |
| (११) | १५३६ | १० | सांगोला नगरपरिषद हद्दीत वाढती लोकसंख्या लक्षात घेता दररोज मोठ्या प्रमाणात ओला घनकचरा निर्माण होत आहे. मात्र या ओल्या कचऱ्याची वैज्ञानिक पद्धतीने विल्हेवाट लावण्यासाठी आवश्यक असलेले कंपोस्ट खत निर्मिती प्रकल्प किंवा बायोगॅस प्रकल्प उभारलेले नसल्याने, ओला कचरा उघड्यावर साठून राहणे, दुर्गंधी पसरणे, डास-माशांचा प्रादुर्भाव वाढणे आणि पर्यावरण तसेच सार्वजनिक आरोग्याला धोका निर्माण होण्याची समस्या उद्भवत आहे. ओल्या कचऱ्याचे स्थानिक पातळीवर प्रक्रिया करून त्यापासून कंपोस्ट खत निर्मिती करून प्रकल्प उभारण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१२) | १५३७ | १० | सांगोला शहराचे नागरीकरण झपाट्याने होत असल्याने नागरी भागात दैनंदिन १० हजाराहून अधिक मेट्रिक टन कचरा निर्माण होत आहे. या घन कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी १ हजार लोकसंख्येमागे १ सफाई कामगार असून बाह्ययंत्रणेद्वारे १३० कंत्राटी कामगार काम करत आहेत. या १३० कंत्राटी कामगारांना सांगोला नगरपरिषदेमध्ये कायम स्वरूपी सफाई कामगार म्हणून नियुक्ती दिल्यास बाह्ययंत्रणेवर होणारा खर्च कमी होऊन सदर कर्मचाऱ्याना कायम स्वरूपी सफाई कामगार म्हणून नियुक्ती देण्याबाबत राज्य शासनाने तात्काळ नव्याने आकृतीबंधास मान्यता देण्याची आवश्यकता आहे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना |
| (१३) | १५३९ | १० | सांगोला शहराचे नागरीकरण झपाट्याने झाले असल्याने नागरी भागात दैनंदिन १० हजाराहून अधिक मेट्रिक टन कचरा निर्माण होत आहे. या घन कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी सांगोला नगरपरिषदेकडे ७ वाहने असून त्यांची काही वाहनांची क्षमता कालबाह्य झाले असून सांगोला नगर परिषदेला कचऱ्याची विल्हेवाट लावण्याकरिता १० वाहनाची आवश्यता आहे. तरी राज्य शासनाने सांगोला नगर परिषदेला कचऱ्याची विल्हेवाट लावण्याकरिता १० वाह्नानाची खरेदी करण्याकरिता निधीची तरतूद करण्यात यावी.याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना |
| | | | **श्री. संजय मेश्राम** |
| (१४) | १६६२ | १० | नागपूर जिल्ह्यातील भिवापूर नगरपंचायत हद्दीतील आठवडी बाजाराच्या विकासासाठी बाजार ओटे, अंतर्गत रस्ते व इतर मूलभूत सुविधा निर्माण करण्याच्या |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | कामासाठी शासनाकडून रु. २.०० कोटी (२००.०० लक्ष) निधीस प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली असणे,भिवापूर परिसरातील शेतकरी, लघु व्यापारी, भाजीपाला विक्रेते, किरकोळ व्यावसायिक व ग्रामीण भागातील नागरिकांच्या आर्थिक व्यवहारांचे प्रमुख केंद्र म्हणून आठवडी बाजाराचे महत्त्व असणे,सदर कामांतर्गत बाजार ओटे, अंतर्गत रस्ते, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, स्वच्छता सुविधा, प्रकाश व्यवस्था व इतर आवश्यक पायाभूत सुविधा उभारण्यात येणार असणे,मात्र मंजूर निधीपैकी केवळ रु. १.०० कोटी (१००.०० लक्ष) निधी प्राप्त झालेला असून उर्वरित रु. १.०० कोटी (१००.०० लक्ष) निधी अद्याप वितरित करण्यात आलेला नसणे,निधीअभावी बाजार विकासाची कामे अपूर्ण राहिलेली असणे अथवा संथ गतीने सुरू असणे,अंतर्गत रस्ते अपूर्ण असल्याने बाजार परिसरात वाहतूक कोंडी, चिखल, धूळ व नागरिकांच्या हालचालींमध्ये अडथळे निर्माण होत असणे,बाजार ओटे अपुरे असल्यामुळे शेतकरी व व्यापाऱ्यांना उघड्यावर अथवा असुविधाजनक ठिकाणी व्यवसाय करावा लागत असणे,पुरेशा सुविधांचा अभाव असल्याने शेतकरी, व्यापारी व ग्राहकांना गैरसोयींचा सामना करावा लागत असणे तसेच स्थानिक आर्थिक व्यवहारांवर प्रतिकूल परिणाम होत असणे,कामाच्या विलंबामुळे बांधकाम साहित्य व मजुरी दरात वाढ होऊन शासनावर अतिरिक्त आर्थिक भार पडण्याची शक्यता निर्माण झालेली असणे,नगरपंचायत व स्थानिक लोकप्रतिनिधींकडून सातत्याने पाठपुरावा करूनही उर्वरित निधी उपलब्ध करून देण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही झालेली नसणे ,ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या आठवडी बाजाराच्या विकासाकडे दुर्लक्ष होत असल्यामुळे शेतकरी, व्यापारी व नागरिकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झालेली असणेत्यामुळे भिवापूर नगरपंचायत अंतर्गत आठवडी बाजाराकरिता बाजार ओटे, अंतर्गत रस्ते व इतर साईट सुविधा बांधकामासाठी मंजूर करण्यात आलेल्या निधीपैकी उर्वरित रु. १.०० कोटी निधी तात्काळ वितरित करून कामे निर्धारित कालमर्यादेत पूर्ण करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१५) | १६६३ | १० | नागपूर जिल्ह्यातील कुही नगरपंचायत क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी विविध पायाभूत सुविधा व सार्वजनिक उपयोगाच्या कामांची आवश्यकता असणे,नगरपंचायत कुही येथे नागरिकांसाठी आधुनिक व सुसज्ज वाचनालयाची सुविधा उपलब्ध नसणे,नगरपंचायत कुही येथे सुसज्ज वाचनालयाचे बांधकाम व आवश्यक फर्निचर उपलब्ध करून देण्यासाठी अंदाजे रु. १.५० कोटी निधीची आवश्यकता असणे,नगरपंचायत क्षेत्रात सामाजिक, सांस्कृतिक व सार्वजनिक कार्यक्रमांसाठी पुरेशा क्षमतेचे सभागृह उपलब्ध नसणे,शहरातील सामाजिक सभागृहाचे बांधकाम करण्यासाठी अंदाजे रु. ५.०० कोटी निधीची आवश्यकता असणे,नगरपंचायत कुही येथे हनुमान मंदिर ते अग्निशमन केंद्रापर्यंतचा मार्ग अत्यंत वर्दळीचा असून सदर मार्गाचे सिमेंट कॉंक्रीट रस्त्यात रूपांतर करणे आवश्यक |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | असणे,सदर सी.सी. रोड बांधकामासाठी अंदाजे रु. १.५० कोटी निधीची आवश्यकता असणे,नगरपंचायत कुही क्षेत्रातील विविध भागांमध्ये पावसाळयात पाणी साचणे, सांडपाण्याचा निचरा न होणे व नागरिकांना आरोग्यविषयक समस्यांचा सामना करावा लागत असणे,नगरपंचायत कुही येथे विविध ठिकाणी एच.पी. ड्रेन बांधकामासाठी अंदाजे रु. ५.०० कोटी निधीची आवश्यकता असणे,वरील सर्व कामांसाठी आवश्यक निधी उपलब्ध न झाल्यामुळे विकासकामे हाती घेता आलेली नसणे,नागरिक, विद्यार्थी, युवक, महिला व ज्येष्ठ नागरिकांना आवश्यक सुविधा मिळण्यापासून वंचित राहावे लागत असणे,नगरपंचायत व स्थानिक लोकप्रतिनिधींनी सातत्याने पाठपुरावा करूनही आवश्यक निधी मंजूर करण्याबाबत कार्यवाही झालेली नसणे,नगरपंचायत कुहीच्या विकासासाठी अत्यावश्यक असलेल्या या कामांकडे दुर्लक्ष होत असल्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झालेली असणे, म्हणून माझ्या विधानसभा मतदारसंघात नगरपंचायत कुही येथे सुसज्ज वाचनालय बांधकाम व फर्निचर, सामाजिक सभागृह बांधकाम, हनुमान मंदिर ते अग्निशमन केंद्र सी.सी. रोड बांधकाम तसेच विविध ठिकाणी एच.पी. ड्रेन बांधकाम या कामांसाठी आवश्यक असलेला एकूण अंदाजे रु. १३.०० कोटी निधी तात्काळ मंजूर करून कामे हाती घेण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१६) | १६६४ | १० | स्थानिक लोकप्रतिनिधींच्या मतदार संघात नव्याने स्थापन झालेल्या कुही नगरपंचायतीस, (जिल्हा नागपूर)विविध राज्यस्तरीय योजनांतर्गत मंजूर करण्यात आलेल्या विकासकामांसाठी निधी मंजूर असणे,वैशिष्ट्यपूर्ण योजना २०२४-२५ अंतर्गत ग्रीन जिम बसविणे या कामासाठी रु. २५.०० लक्ष निधी मंजूर असणे,वैशिष्ट्यपूर्ण योजना २०२३-२४ अंतर्गत हायमास्ट व ग्रीन जिम काम या विकासकामासाठी रु. ३३.५९ लक्ष निधी मंजूर असणे, नव्याने स्थापन नगरपंचायतीला आर्थिक अर्थसहाय्य योजना अंतर्गत वार्ड क्र. २ मध्ये रणजीत डहाके ते जगदीश धनजोडे घरापर्यंत एच.पी. ड्रेन बांधकाम करण्यासाठी रु. ३.९१ लक्ष निधी मंजूर असणे,सदर विकासकामांसाठी एकूण रु. ६२.४९ लक्ष निधी मंजूर असताना तो अद्याप नगरपंचायतीस प्राप्त झालेला नसणे,निधीअभावी ग्रीन जिम, हायमास्ट व एच.पी. ड्रेन यांसारखी महत्त्वाची विकासकामे रखडलेली अथवा संथ गतीने सुरू असणे,ग्रीन जिमची सुविधा उपलब्ध न झाल्यामुळे युवक, महिला व ज्येष्ठ नागरिकांना आरोग्यविषयक सुविधा मिळण्यापासून वंचित राहावे लागत असणे,हायमास्ट उभारणीचे काम पूर्ण न झाल्यामुळे सार्वजनिक ठिकाणी अपुरी प्रकाश व्यवस्था राहून नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झालेला असणे,वार्ड क्र. २ मधील एच.पी. ड्रेन बांधकाम प्रलंबित असल्याने सांडपाणी निचरा व पावसाळयात पाणी साचण्याच्या समस्या निर्माण होत असणे,निधीच्या विलंबामुळे विकासकामांच्या खर्चात वाढ होण्याची शक्यता निर्माण झालेली असणे व शासनावर अतिरिक्त आर्थिक भार पडण्याचा धोका असणे,नगरपंचायत व स्थानिक लोकप्रतिनिधींनी सातत्याने पाठपुरावा करूनही मंजूर निधी वितरित करण्याबाबत आवश्यक कार्यवाही झालेली |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | नसणे,विकासकामे रखडल्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झालेली असणे तसेच नगरपंचायत क्षेत्राच्या सर्वांगीण विकासाला बाधा निर्माण झालेली असणे संबंधित नगरपंचायतीस वैशिष्ट्यपूर्ण योजना २०२४-२५, वैशिष्ट्यपूर्ण योजना २०२३-२४ व नव्याने स्थापन नगरपंचायतीला आर्थिक अर्थसहाय्य योजना अंतर्गत मंजूर करण्यात आलेला एकूण रु. ६२,४९,८२९/- निधी तात्काळ वितरित करून प्रलंबित विकासकामे निर्धारित कालमर्यादेत पूर्ण करण्यासाठी शासनाने विशेष कार्यवाही करावी, त्यामुळे माझे शासनाकडे विनंती आहे की माझ्या मतदारसंघातील नव्याने स्थापन झालेल्या कुही नगरपंचायतीस उपरोक्त सर्व विकास कामांना शासनाने तातडीने निधी उपलब्ध करून द्यावा याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एफ-२**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२१७, नगरविकास**<br>**बाब क्रमांक: ८३, रूपये:- ३,०७६,००,००,०००/-**<br>**श्री. संजय मेश्राम** |
| (१७) | १५९२ | १० | नागपूर जिल्ह्यातील उमरेड नगरपालिका क्षेत्रातील पाणीपुरवठा व्यवस्था अत्यंत असमाधानकारक अवस्थेत असून, शहरातील अनेक भागांमध्ये सातत्याने पाणीटंचाई निर्माण होणे,पाणीपुरवठा वितरणात अनियमितता व असमानता दिसून येणे, तसेच अनेक नागरिकांना नियमित पाणीपुरवठा न मिळाल्याने दैनंदिन जीवन विस्कळीत होणे,उमरेड शहरातील नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी स्वखर्चाने पाणी विकत घ्यावे लागत असून त्यामुळे आर्थिक भार वाढलेला असणे,पाईपलाईन गळती, अपुरी देखभाल-दुरुस्ती व नियोजनातील त्रुटी यामुळे पाणीपुरवठा यंत्रणा वारंवार विस्कळीत होणे,स्थानिक नागरिक व लोकप्रतिनिधी यांच्याकडून वारंवार तक्रारी करूनही प्रशासनाकडून ठोस व प्रभावी उपाययोजना करण्यात आलेल्या नसणे;परिणामी नागरिकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला असून माहे मे २०२६ च्या सुमारास या प्रश्नावर मोठ्या प्रमाणावर नाराजी व्यक्त करण्यात येत असल्याचे निदर्शनास आलेले असणे परिणामी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१८) | १६६१ | १० | नागपूर जिल्ह्यातील भिवापूर नगर पंचायत अंतर्गत प्रशासकीय इमारत बांधकामासाठी शासनाकडून एकूण रु. ३.०० कोटी (३००.०० लक्ष) निधीस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली असणे,भिवापूर नगर पंचायत क्षेत्रातील वाढती लोकसंख्या, वाढत्या नागरी गरजा तसेच नागरिकांना विविध शासकीय व नागरी सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने सदर प्रशासकीय इमारत प्रकल्प मंजूर करण्यात आलेला असणे,मात्र मंजूर निधीपैकी केवळ रु. १.५० कोटी (१५०.०० लक्ष) निधी वितरित करण्यात आलेला असून उर्वरित रु. १.५० कोटी (१५०.०० लक्ष) निधी अद्यापही प्रलंबित ठेवण्यात आलेला असणे,निधीच्या कमतरतेमुळे प्रशासकीय इमारतीचे बांधकाम संथ गतीने सुरू असणे अथवा काही कामे अपूर्ण अवस्थेत राहिलेली असणे,यामुळे नगर पंचायत प्रशासनास नागरिकांना आवश्यक |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | सेवा देण्यासाठी अपुऱ्या जागेत कामकाज करावे लागत असणे व प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रतिकूल परिणाम होत असणे,नागरिकांना विविध दाखले, परवाने, कर भरणा, नागरी सुविधा, विकासकामांबाबत माहिती तसेच इतर शासकीय सेवा प्राप्त करण्यासाठी गैरसोयींना सामोरे जावे लागत असणे,कामाच्या विलंबामुळे बांधकाम साहित्य, मजुरी व इतर खर्चात वाढ होऊन शासनावर अतिरिक्त आर्थिक भार पडण्याची शक्यता निर्माण झालेली असणे,नगर विकास विभाग व संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांकडे वारंवार पाठपुरावा करूनही उर्वरित निधी वितरित करण्याबाबत अपेक्षित कार्यवाही होत नसणे,शासनाने विकासकामांना गती देण्याच्या घोषणा केल्या असताना मंजूर प्रकल्पांसाठी आवश्यक निधी वेळेवर उपलब्ध न झाल्याने विकासकामांच्या अंमलबजावणीबाबत शासनाच्या धोरणात्मक नियोजनावर प्रश्नचिन्ह निर्माण झालेले असणे,तसेच भिवापूर नगर पंचायतच्या नागरिकांमध्ये या प्रकरणी तीव्र नाराजी निर्माण झालेली असून स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मूलभूत प्रशासकीय पायाभूत सुविधांच्या विकासाकडे दुर्लक्ष होत असल्याची भावना निर्माण झालेली असणे, म्हणून भिवापूर नगर पंचायत प्रशासकीय इमारत बांधकामासाठी मंजूर करण्यात आलेल्या निधीपैकी उर्वरित रु. १.५० कोटी निधी तात्काळ वितरित करून काम निश्चित कालमर्यादेत पूर्ण करण्यासाठी विशेष निधी उपलब्ध करून देण्यात यावा, तसेच निधी वितरणास झालेल्या विलंबाची जबाबदारी निश्चित करून संबंधित प्रकरणाचा आढावा घेण्यात यावा, व तात्काळ निधी उपलब्ध करून देण्यात यावा याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एफ-२**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२१७, नगरविकास**<br>**बाब क्रमांक: ८४, रूपये:- २,००,००,०००/-**<br>**डॉ. बाबासाहेब देशमुख** |
| (१९) | १५३५ | १० | सोलापूर जिल्ह्यातील सांगोला मतदारसंघाचे ज्येष्ठ नेते व महाराष्ट्र विधानसभेतील सर्वाधिक काळ आमदार म्हणून कार्य केलेले स्वर्गीय भाई गणपतराव देशमुख यांनी आपल्या आयुष्यभर शेतकरी, कष्टकरी व सर्वसामान्य जनतेच्या हक्कासाठी कार्य केले. त्यांच्या साधेपणामुळे व जनतेशी असलेल्या घट्ट नात्यामुळे ते महाराष्ट्रातील आदर्श लोकनेते म्हणून ओळखले जातात. स्वर्गीय भाई गणपतराव देशमुख यांनी तब्बल अनेक दशके सांगोला मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करताना शिक्षण, शेती, पाणीपुरवठा, रस्ते व ग्रामीण विकासासाठी मोठे योगदान दिले आहे. त्यांच्या कार्याचा सन्मान व पुढील पिढ्यांना प्रेरणा मिळावी या उद्देशाने सांगोला शहरात त्यांच्या स्मरणार्थ भव्य स्मारक उभारण्यासाठी शासनामार्फत तात्काळ कार्यवाही करून निधीची तरतूद करण्यात यावी. याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. अभिजीत पाटील** |
| (२०) | १६७९ | १०० | माढा विधानसभा कार्यक्षेत्रातील माढा हे तालुकयाचे ठिकाण असून येथे छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्मारक नसणे, शहरातील रहदारीच्या चौकामध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्मारक उभारल्यास ते नवीन पिढीला प्रेरणादायी ठरेल, तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्मारक व्हावे अशी शहरवासियांचीं ब-याच वर्षापासूनची असलेली मागणी, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने लक्ष घालून सोलापूर जिल्हयातील माढा शहरामध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्मारक मंजूर करुन 10.00 कोटीचा निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एफ-४**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२१७, नगरविकास**<br>**बाब क्रमांक: ८७, रूपये:- १,००,००,००,०००/-**<br>**श्री. सुनिल प्रभू** |
| (२१) | १६११ | १० | “ मुंबई गोरेगाव (पूर्व), पी/उत्तर विभाग, जनरल अरुणकुमार वैद्य मार्ग, मौजे दिंडोशी येथील न.भू.क्र.९९ पैकी १०९,१०८ या भूखंडावर अनुक्रमे असलेल्या आरओएस/उद्यान/पार्क तसेच आरपीयु न्यायालय आणि आर आर शासकीय निवासस्थानाचे आरक्षणात बदल करुन, यामध्ये आरपीयु पोलीस ठाणे आणि आर आर पोलीस वसाहत असे आरक्षण टाकणेबाबतच्या प्रस्तावास अद्यापही शासनाने मंजूरी दिली नसल्याचा प्रकार निदर्शनास येणे, सदरहू भूखंडावर आरक्षणात बदल करुन, पोलीस आयुक्त, कार्यालय परिमंडळ-१२ आणि दिंडोशी पोलीस ठाणे उभारण्याबाबतची लोक प्रतिनिधींनी मागणी केलेली असणे,न.भू.क्र. १०८ फिल्मसिटी रोड येथील शासनाच्या ४११७.६ चौ.मी क्षेत्रफळाच्या भूखंडावरील मनोरंजन मैदानाचे आरक्षण वगळून भूखंड पोलीस विभागासाठी आरक्षित ठेवण्याबाबत, मुंबई महापालिकेस दि.०४.०४.२०२२ अन्वये महापालिकेस निर्देश देणेबाबत मुख्य सचिव (गृह) महाराष्ट्र शासन यांच्याकडे विनंती केल्यानुसार, विषयाकिंत भूखंड उपरोक्त उदिष्टाकरिता भूखंडावरील न्यायालय व शासकीय गृहनिर्माणाचे आरक्षण बदलून, पोलीस विभागाकरिता आरक्षित करण्यासाठी विकास आराखडा २०३४ मध्ये महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ च्या तरतुदीनुसार फेरबदल करणेबाबतच्या प्रस्तावास नगरविकास विभागाने, मंजूरी देऊन, उक्त भूखंडावर पोलीस आयुक्त, कार्यालय परिमंडळ-१२ आणि दिंडोशी पोलीस ठाणे बांधणेबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२२) | १६१२ | १० | “मुंबई मालाड (पूर्व) गोदरेज टॅक्वील ते नुतन विद्यामंदिर ते एमएमआरडीए पीएपी वसाहत ते जिजामाता शाळा या दरम्यानच्या ठिकाणी मलनिस्सारण वाहिनी टाकणे संदर्भात लोकप्रतिनिधींनी मा. पालकमंत्री महोदयांना दि.१०.०२.२०२६ रोजी लेखी निवेदन देऊनही, अद्याप महापालिका प्रशासन तथा प्रमुख अभियंता (मलनिस्सारण प्रकल्प) यांनी यावर कोणतीच कार्यवाही केली नसल्याची बाब निदर्शनास येणे, कार्यकारी अभियंता (मलनिस्सारण प्रकल्प) नियोजन आणि संकल्प चित्रे यांनी दि. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | १८.०५.२०२३ रोजीच्या पत्रान्वये न.भू.क्र.१६३ ए/२ (पैकी) मौजे आकुर्ली येथील आकुर्ली रोड/वडारपाडा रोड नं.१ ते गोदरेज टॅक्वील येथपर्यंतचा झो.पू. योजनामधून १८.३० मीटर रुंदीचा विकास नियोजन रस्ता जात असून, सदर रस्त्यावरील झोपडया काढून अंदाजे ६५० मीटरचा रस्ता हंस्तातरीत करण्यास मागणी करण्यात येणे, अनुपालन अहवालात शासनाने दिलेल्या उत्तरानुसार उक्त भूखंडावर एसआरए योजना राबविणेबाबत विकासकाने, अद्याप प्राधिकरणास प्रस्ताव सादर केला नसल्यामुळे सदरहू विकास नियोजन रस्त्याचे काम ठप्प असणे, सदरहू ठिकाणी मलनिस्सारण वाहिनी टाकून, उपरोक्त ६५० मीटर लांबीचा १८.३० मीटर रुंदीचा विकास नियोजन रस्ताचे काम तातडीने पुर्ण करण्याच्या दृष्टीने, शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एफ-५**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ४२१७, नगर विकासावरील भांडवली खर्च**<br>**बाब क्रमांक: ८९, रूपये:- २५,००,००,०००/-**<br>**डॉ. बाबासाहेब देशमुख** |
| (२३) | १५४० | १० | सांगोला शहराचे नागरीकरण झपाट्याने झाले असल्याने नागरी भागात दळणवळण मोठ्या प्रमाणात होत आहे सांगोला शहरात सांगोला नगर परिषदेची जागा उपलब्ध असून या ठिकाणी नगरपालिकेच्या पायाभूत सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याकरिता नगर विकास संकुल उभारण्याची आवश्यकता आहे. तरी सांगोला नगर परिषद हद्दीमध्ये संकुल उभरण्या बाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एफ-५**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ४२१७, नगर विकासावरील भांडवली खर्च**<br>**बाब क्रमांक: ९१, रूपये:- १,५०,००,००,०००/-**<br>**श्री. अस्लम शेख** |
| (२४) | १५४८ | १० | मुंबईतील उपनगरातील प्रवाशांच्या सोयीसाठी आणि लोकल रेल्वेवरील ताण कमी करण्यासाठी गुंदविली (रेड लाईन-७) ते अंधेरी पश्चिम (येलो लाईन-२ए) अशी थेट मेट्रो सेवा सुरू करण्यात आली असणे, दि. ८ एप्रिल २०२६ पासून गुंदविली ते काशीगाव (रेड लाईन) मेट्रो सेवा सुरू झाल्यापासून, अंधेरी पश्चिमेकडील आनंद नगर, कांदरपाडा, बोरीवली पश्चिम, शिंपोली, कांदिवली, मालाड पश्चिम, गोरेगाव पश्चिम, ओशिवरा व अंधेरी पश्चिम या भागांत जाणाऱ्या प्रवाशांना दहिसर पूर्व येथे उतरून दुसरी मेट्रो पकडावी लागत असणे, थेट सेवा बंद झाल्यामुळे प्रवाशांना दहिसर पूर्व येथे गाडी बदलावी लागत असून, यामुळे प्रवाशांचा दररोज सुमारे २० मिनिटांचा वेळ वाया जात आहे, तसेच शालेय-महाविद्यालयीन विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक व नोकरदार वर्गाला नाहक मनस्ताप व त्रास सहन करावा लागत असणे, या दोन्ही मेट्रो लाईन्ससाठी थेट जोडणी करणाऱ्या स्वतंत्र मार्गिका उपलब्ध असतानाही, केवळ प्रशासकीय नियोजनाअभावी या मार्गिकांचा योग्य वापर न करता थेट सेवा बंद ठेवण्यात आली असणे, त्यामुळे जनमानसात पसरलेला तीव्र असंतोष व चिडीची |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | भावना, पश्चिम उपनगरातील पूर्व आणि पश्चिम भागांना जोडणारा हा थेट प्रवास पुन्हा सुसह्य करण्यासाठी गुंदविली ते अंधेरी (पश्चिम) अशी थेट मेट्रो सेवा तातडीने पूर्ववत सुरू करण्याबाबत शासनाने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एफ-५**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ४२१७, नगर विकासावरील भांडवली खर्च**<br>**बाब क्रमांक: ९३, रूपये:- ७,७०,००,००,०००/-**<br>**श्री. अजय चौधरी** |
| (२५) | १६६६ | १०० | मुंबईतील फ/दक्षिण प्रभागांमधील प्रभादेवी स्थानकाजवळ शिवडी, वरळी उन्नत मार्गाच्या कामामध्ये पर्जन्यवाहिनी कंत्राटदाराकडून तोडण्यात आली होती. त्यामुळे २४ जून, २०२६ रोजी पावसामुळे मोठ्या प्रमाणात पाणी तुंबले होते. पावसाळ्यापूर्वी पर्जन्य वाहिन्या व रस्त्यावरील आवश्यक कामे करण्याकरता महापालिकेच्या अधिकाऱ्यांनासोबत स्थानिक आमदार म्हणून मी अनेक बैठका घेतल्या. तसेच सहाय्यक आयुक्त, मुंबई महानगरपालिका यांनी एकूण 8 वेळा पाहणी केली व तातडीने कामे करण्याची सूचना दिली. त्यानुषंगाने अतिरिक्त महापालिका आयुक्त, शहर यांनी एमएमआरडी सोबत उच्चस्तरीय बैठक घेऊन पावसाळ्यापूर्वी काम पूर्ण करण्याच्या अनुषंगाने आदेश दिले. एमएमआरडीएच्या कंत्राटदाराला महानगरपालिकेने सुमारे दीड कोटी रुपयांचा दंड ठोठावला आहे. तथापि एमएमआरडीएकडून शिवडी वरळी उन्नत मार्गातील जगन्नाथ भातणकर मार्गावरील कामे पावसाळापूर्वी पूर्ण करण्यात आली नाहीत. त्यामुळे सोसायटीतील 26 जून, २०२६रोजी मोठ्या प्रमाणात पाणी तुंबून नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागला. या ठिकाणी नागरिकांना रेल्वे स्थानकाकडे अडथळे निर्माण झाले असून आजूबाजूच्या घरांमध्ये पाणी जाण्याचे प्रमाण घडले आहे. पावसाळापूर्वी जगन्नाथ भातणकर मार्गावरील आवश्यक कामे पूर्ण करणे गरजेचे असताना. एमएमआरडीकडून यावर वारंवार दुर्लक्ष होत आहे. सदर कामाच्या कंत्राटदारला अनेक वेळा सांगून देखील कामे पूर्ण केली जात नाहीत. त्यामुळे शासनाने याबाबत चौकशी करून तातडीने उपाययोजना करण्याचे आदेश होणे आवश्यक आहे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना |
| (२६) | १६७२ | १०० | मुंबईतील फ/दक्षिण विभागामधील मेघवाडी, लालबाग भूभाग क्र..४/११८, ७/११८ या एकूण ३२५४.२१ चौ.मी. क्षेत्रफळ असलेल्या भूखंडावर '' महानगरपालिका शाळा '' आरक्षण आहे. सदर भूखंडाच्या शेजारील भूभाग क्र..१/११८, १ बी/११८, २/११८,३/११८ या एकूण ४,६१७.९३ चौ.मी. क्षेत्रफळ असलेल्या भूखंडावर '' मनोरंजन मैदान'' आरक्षण आहे. सदर भूखंडाच्या लगतच्या असलेल्या भूभाग क्र.०६/१०८ वर महानगरपालिकेची शाळा असून सदर शाळेच्या पुनर्विकास मनपाच्या वतीने करण्यात येत आहे. सार्वजनिक हिताच्या उदेशाने भूभाग व्रâ.४/११८ व ७/११८ या भूखंडावरील आरक्षण बदलून '' मनोरंजन मैदान'' असे |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | आरक्षण करावे, त्यामुळे परिसरातील नागरिकांना नागरी सुविधांचा वापर करता येईल.सदर सर्व भूभागावर – मनोरंजन मैदान '' असे आरक्षण संपूर्ण ७८७२.१४ चौ.मी. भूखंडावर करून खेळाडूकरिता सुविधा उपलब्ध करुन द्यावी. याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **डॉ. बाबासाहेब देशमुख** |
| (२७) | १५३८ | १० | सांगोला नगरपरिषद हद्दीत वाढत्या लोकसंख्येच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना आवश्यक असलेल्या मूलभूत नागरी सुविधा अपुऱ्या प्रमाणात उपलब्ध असल्याचे दिसून येत आहे. नगरपरिषद क्षेत्रातील अनेक भागांमध्ये अंतर्गत रस्ते निकृष्ट अवस्थेत आहेत किंवा अपूर्ण आहेत, तसेच अनेक ठिकाणी रस्त्यावरील लाईटची अपुरी व्यवस्था असल्यामुळे नागरिकांना रात्रीच्या वेळी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्याचप्रमाणे शहरातील सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वाचे असलेले सीसीटीव्ही कॅमेरे पुरेशा प्रमाणात बसविण्यात आलेले नाहीत, त्यामुळे चोरी, गुन्हेगारी यांसारख्या घटनांवर नियंत्रण ठेवणे कठीण होत आहे. याशिवाय अनेक भागांमध्ये भूमिगत गटार व्यवस्था नसल्यामुळे सांडपाणी रस्त्यावर वाहत राहते, परिणामी दुर्गंधी, अस्वच्छता आणि आरोग्याच्या समस्या निर्माण होत असल्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. नानाभाऊ पटोले** |
| (२८) | १६७६ | १० | साकोली नगर परिषद व लाखनी-लाखांदूर या शहरामध्ये योग्य कव्हर असलेले गटारे नसणे, पावसाळयात पाणी साचू नये म्हणून सांडपाणी निचरा व्यवस्था नसणे, रस्ते डांबरीकरण व सिमेंट रस्ते बांधकाम अपुर्ण असणे प्रत्येक प्रभागासाठी पुरेसे स्वच्छता कर्मचारी उपलब्ध नसणे, शहरातील उद्याने. तलाव विकासासाठी निधी उपलब्ध नसणे,याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. बापूसाहेब पठारे** |
| (२९) | १६८७ | १० | सन २००० मध्ये कळस गावाचा पुणे महानगरपालिकेमध्ये समावेश झाला. मात्र, समावेश होऊन २५ वर्षांहून अधिक कालावधी उलटूनही सर्वे क्रमांक १२६ मधील स्मशानभूमीकडे जाणाऱ्या रस्त्याची जागा पुणे महानगरपालिकेने अद्याप ताब्यात घेतलेली नाही. तसेच संबंधित जमीनमालकांना देय असलेला मोबदला देखील अदा करण्यात आलेला नाही. परिणामी, अंत्यविधीसाठी जाणाऱ्या नागरिकांना संबंधित जागामालकांशी करार करून रस्ता वापरण्यासाठी आर्थिक मोबदला द्यावा लागत आहे. मृत व्यक्तीच्या अंत्यसंस्कारासारख्या अत्यंत संवेदनशील प्रसंगी नागरिकांना अशा प्रकारच्या आर्थिक व मानसिक त्रासाला सामोरे जावे लागत असून, ही बाब अत्यंत गंभीर, दुर्दैवी आणि नागरिकांच्या मूलभूत हक्कांवर गदा आणणारी आहे. पुणे महानगरपालिकेच्या नियोजनातील व प्रशासकीय दिरंगाईमुळे ही समस्या |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | आजतागायत कायम आहे. त्यामुळे शासनाने या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन संबंधित रस्त्याचे भूसंपादन पूर्ण करावे, जमीनमालकांना नियमानुसार मोबदला अदा करावा आणि स्मशानभूमीकडे जाण्यासाठी नागरिकांना कायमस्वरूपी, विनामूल्य व निर्बाध सार्वजनिक रस्ता उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.. |
| (३०) | १६९० | १० | वडगाव शेरी मतदारसंघातील विश्रांतवाडी चौक ते धानोरी गाव मार्गे लोहगावकडे जाणारा मुख्य रस्ता हा गेल्या २५ वर्षांहून अधिक काळापासून रुंदीकरण व विकासापासून वंचित आहे. या परिसरात मोठ्या प्रमाणात नागरीकरण झाले असून लोकसंख्या व वाहनांची संख्या लक्षणीयरीत्या वाढली आहे. मात्र, त्यानुसार रस्त्याचा विकास झालेला नाही. सदर रस्ता अत्यंत अरुंद असल्यामुळे धानोरी, लोहगाव व परिसरात दिवसेंदिवस तीव्र वाहतूक कोंडी निर्माण होत आहे. परिणामी, नागरिकांचा मोठ्या प्रमाणावर वेळ व इंधन वाया जात असून त्यांना आर्थिक, मानसिक व शारीरिक त्रासाला सामोरे जावे लागत आहे. तसेच आपत्कालीन सेवा, रुग्णवाहिका, अग्निशमन दल व शालेय वाहतुकीलाही गंभीर अडथळे निर्माण होत आहेत. ही समस्या लक्षात घेता शासनाने या रस्त्याच्या रुंदीकरणासाठी आवश्यक भूसंपादन, निधी व प्रशासकीय मंजुरी तातडीने पूर्ण करून विश्रांतवाडी चौक–धानोरी–लोहगाव मुख्य रस्त्याचे रुंदीकरण व आधुनिकीकरण युद्धपातळीवर हाती घेऊन लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी. |
| (३१) | १६९१ | १० | लोहगाव–निरगुडी रस्त्यावरील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते खंडोबा माळ मार्गाचा प्रारूप विकास आराखड्यात किंवा पुणे मनपा कलम २०५ अंतर्गत १२ मीटर रुंदीने विकसित करण्याबाबत. वडगाव शेरी मतदारसंघातील लोहगाव–निरगुडी रस्त्यावरील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते खंडोबा माळ हा मार्ग सध्या शेतकऱ्यांच्या खाजगी जमिनीतून जात असून, संबंधित शेतकऱ्यांनी केवळ नागरिकांच्या सोयीसाठी तात्पुरत्या स्वरूपात वापरासाठी उपलब्ध करून दिलेला आहे. सदर मार्गाचा लोहगाव प्रारूप विकास आराखड्यामध्ये समावेश करण्यात आलेला नसल्यामुळे या रस्त्याच्या विकासास अडथळा निर्माण झाला आहे. या परिसरातील नागरिकांना ये-जा करण्यासाठी अन्य कोणताही पर्यायी रस्ता उपलब्ध नसल्याने हजारो नागरिकांना दररोज मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. तसेच रस्त्याला कोणतेही वैधानिक संरक्षण नसल्यामुळे भविष्यात हा मार्ग बंद होण्याची शक्यता असून नागरिकांच्या दळणवळणाचा गंभीर प्रश्न निर्माण होऊ शकतो. त्यामुळे सदर रस्ता लोहगाव प्रारूप विकास आराखड्यामध्ये किमान १२ मीटर रुंदीने समाविष्ट करण्यात यावा किंवा पुणे महानगरपालिका अधिनियमातील कलम २०५ अंतर्गत १२ मीटर रुंदीने विकसित करण्यात यावा. यामुळे संबंधित जमीनमालकांना त्यांच्या जमिनीचा नियमानुसार योग्य मोबदला मिळेल तसेच या परिसरातील नागरिकांना कायमस्वरूपी, सुरक्षित व दर्जेदार पर्यायी रस्ता उपलब्ध |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | होईल. त्यामुळे शासनाने या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन आवश्यक प्रशासकीय मंजुरी, भूसंपादन व निधीची कार्यवाही पूर्ण करून सदर रस्त्याचा विकास तातडीने करावा याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अभिजीत पाटील** |
| (३२) | १६७८ | १०० | माढा तालुक्यातील टेंभुर्णी येथे सध्या ग्रामपंचायत असून या गावाची सध्याची अंदाजित लोकसंख्या 40 हजार इतकी असणे, या गावांमध्ये मोठी बाजारपेठ असून पालीस खात्याचे एक आऊट पोस्टही कार्यरत असणे, तसेच टेंभुर्णी हे गाव पुणे –सोलापूर या महामार्गावर असून पश्चिम महाराष्ट्र व मराठवाडा यांना जोडणारे सर्व रस्ते या टेंभुर्णी जंक्शन शहरातून जात असणे, श्रीक्षेत्र पंढरपूर येथे यात्रा कालावधीमध्ये ब-याच दिंडया पालख्या या टेंभुर्णी मार्गे येत असल्याने भाविक भक्तांना मुलभूत सोई –सुविधा उपलब्धतेचा भार या ग्रामपंचायसतीवर पडत असलयामुळे टेंभुर्णी ग्रांमपंचायतीचे नगरपंचायत होणे आवश्यक असणे, टेंभुर्णी या गावाच्या वाढत्या लोकसंख्येचा विचार करता ग्रामस्थांना मुलभूत सोई-सुविधा मिळण्यासाठी नगरपंचायत होणे गरजेचे असणे,टेंभुर्णी ग्रामपंचायतीचे नगरपंचायत होऊन नगरपंचायतीच्या सर्वागीण विकासासाठी भरघोस निधी उपलब्ध करण्याची आवश्यकता,याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. जयंत पाटील** |
| (३३) | १६६७ | १०० | आष्टा शहर तालुका वाळवा, जिल्हा सांगली, परिसरातील नागरिकांची सोय, सांडपाण्याचा योग्य निचरा आणि तरुणांच्या क्रीडा विकासासाठी येथील मा. विलासराव शिंदे बहुउद्देशीय हॉल दुरुस्ती करणे (अंदाजपत्रकीय रक्कम १.०० कोटी), आष्टा येथील चौगुले मळा पासून धोटे मळा पर्यंत कॅनॉल टाईप आर.सी.सी. गटर बांधणे (अंदाजपत्रकीय रक्कम ५.०० कोटी), आष्टा येथील खोतमळा रस्ता जिजामाता शाळा ते ओढा पर्यंत आर.सी.सी. गटर बांधणे (अंदाजपत्रकीय रक्कम १.०० कोटी) आणि आष्टा येथे अद्ययावत स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स बांधणे (अंदाजपत्रकीय रक्कम ५.०० कोटी) या एकूण १२.०० कोटी रुपयांच्या अत्यंत महत्त्वाच्या सार्वजनिक विकासकामांना मंजुरी देऊन निधी उपलब्ध करून देण्याची आवश्यकता, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपायोजना. |
| (३४) | १६६८ | १०० | सांगली जिल्ह्यातील उरूण ईश्वरपुर शहराचा विस्तार आणि वाढती लोकसंख्या विचारात घेता सध्याची नगरपरिषद प्रशासकीय इमारत कामकाजासाठी अपुरी पडत असणे. नागरिकांना सर्व सुविधा एकाच छताखाली मिळाव्यात यासाठी अत्याधुनिक सोयींनी युक्त अशा नवीन प्रशासकीय इमारतीची अत्यंत गरज असणे, नगरपरिषदेने या इमारतीचा सविस्तर प्रकल्प आराखडा (DPR) तयार केला असणे. या इमारतीकरिता १० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्याची आवश्यकता, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. रामदास मसराम** |
| (३५) | १६८६ | १० | आरमोरी विधानसभा क्षेत्रातील आरमोरी नगरपरिषदेचा विस्तार होत असून येथील लोकसंख्या वाढत असून लोक मूलभूत सोई-सुविधा पासून वंचित असून त्यांना सोई-सुविधा उपलब्ध होण्याकरिता व या क्षेत्राचा विकास होण्यासाठी रस्ते, गटारी, नाले, भू-अंतर्गत गटारे, नाले पाणीपुरवठा योजना या राबविण्याकरिता आरमोरी नगरपरिषदेस वैशिष्टपूर्ण व विशेष अनुदान अंतर्गत निधी उपलब्ध करून देण्यात यावा, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना |
| (३६) | १६८८ | १० | वडसा विधानसभा क्षेत्रातील वडसा नगरपरिषदेचा विस्तार होत असून येथील लोकसंख्या वाढत असून लोक मूलभूत सोई-सुविधा पासून वंचित असून त्यांना सोई-सुविधा उपलब्ध होण्याकरिता व या क्षेत्राचा विकास होण्यासाठी रस्ते, गटारी, नाले, भू-अंतर्गत गटारे, नाले पाणीपुरवठा योजना या राबविण्याकरिता वडसा नगरपरिषदेस वैशिष्टपूर्ण व विशेष अनुदान अंतर्गत निधी उपलब्ध करून देण्यात यावा, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (३७) | १५५६ | १० | मालाड विधानसभा मतदारसंघातील अनेक सोसायटीचे सुरक्षारक्षक आणि अन्य नागरिकांवर भटक्या कुत्र्यांनी भीषण हल्ले केल्याने परिसरात भीतीचे वातावरण होणे, यापूर्वी पुण्यातही भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात एका महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाला असणे, मालाड परिसरातील रस्ते, गल्लीबोळ आणि सोसायट्यांमध्ये भटक्या कुत्र्यांची संख्या अनियंत्रितपणे वाढली असून लहान मुले, महिला व ज्येष्ठ नागरिक असुरक्षित बनले असणे, कुत्रे पाठीमागे लागल्याने दुचाकीस्वारांचे गंभीर अपघात होत असणे, स्थानिक प्रशासनाकडे वारंवार तक्रारी करूनही नसबंदी, लसीकरण किंवा आक्रमक कुत्र्यांना हटवण्याबाबत कोणतीही प्रभावी कारवाई झालेली नसणे, सर्वोच्च न्यायालयानेही आक्रमक व रेबीजग्रस्त कुत्र्यांवर कायद्यानुसार कठोर कारवाईची परवानगी दिली असणे, या समस्येवर नियंत्रण मिळवण्यासाठी शासनाने तातडीने राबवलेली नसबंदी व लसीकरण मोहीम, तसेच नागरिकांच्या सुरक्षेसाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३८) | १५६५ | १० | मुंबईतील वर्सोवा ते मढ प्रस्तावित सागरी किनारा मार्गासाठी सात बंगला (वर्सोवा) येथील २० वर्षे जुन्या नाना-नानी पार्क उद्यानातील १८४ झाडे कापली जाणार असणे, आता विकासाच्या नावाखाली या उद्यानाचे अस्तित्व धोक्यात येणे, ज्येष्ठ नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असणे, त्यामुळे ज्येष्ठ नागरिकांची मोठ्या प्रमाणात कुचंबना होत असून सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीनेही ही बाब गंभीर आहे. सदर परिस्थिती लक्षात घेता उपलब्ध शासकीय जागेवर नवीन व स्वतंत्र नाना-नानी |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | पार्क उद्यान उभारणे अत्यावश्यक असणे, परंतु शासन करीत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी येथील जनतेत पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३९) | १५६७ | १० | मुंबईतील मालवणी, मालाड (प.) हा भाग मोठ्या प्रमाणावर झोपडपट्टयांनी व्यापलेला असून येथे फार मोठ्या प्रमाणावर मोकळया जागा नसणे, त्यामुळे शासनाने येथील (१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान, (२) मोहम्मद रफी उद्यान, (३) अल्लमा शिवजी नोमणी उद्यान, (४) मौलाना अब्दुल कलाम उद्यान, (५) आक्सा उद्यान, (६) म. वा. देसाई उद्यान, (७) अण्णा सावंत मनोरंजन उद्यान, (८) गावदेवी लोटस तलाव उद्यान या उद्यान व क्रिडांगणाचा पायाभूत सुविधांचा विकास करण्याकरीता विशेष निधीची तरतूद करावी, अशी असलेली मागणी, परंतु शासनाकडून कारवाईस होत असलेला विलंब, परिणामीव्यक्त होत असलेला विलंब, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना, |
| (४०) | १५७१ | १० | मुंबई मालाड (प.) येथे मार्वे टी जंक्शन ते पोसरी तलाव पर्यंत खारफुटीच्या संरक्षणासाठी मार्वे रस्त्याच्या दोन्ही बाजूस वन विभागाचे कम्पाऊंड वॉलचे बांधकाम सुरु असणे, येथे २७.४५ मीटर रुंदींचा रस्ता असणे, तेथे वन विभाग रस्ता बांधत असणे, ही भिंत बांधण्यावर फक्त १८-३० मीटर रुंदीचा रस्ता उपलब्ध होणार असणे, तसेच २०.४५ मीटर रुंदीचा रस्ता बांधण्यासाठी सिमेंट काँक्रीट रोड बांधण्याचे टेंडर काढण्यात येणे, तसेच खारफुटीच्या पुर्नलागवणीचा प्रस्ताव महानगरपालिकेच्या रस्ते विभागाने सादर करणे, त्यामुळे भिंत बांधण्यास राज्य शासनाचा निधी वाया जाणार असणे, म्हणून हे काम महानगरपालिकेने थांबवून रस्ता बांधल्यानंतर आरएल नुसार भिंत बांधण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपायोजना. |
| (४१) | १५७३ | १० | मुंबई उपनगर मौज आक्से, ता. बोरीवली स.नं. १५ व १६, न.भु.क्र. १२ पे. १२/१ व मोजे. मालवणी ता. बोरीवली, स.नं. २९८ व २६३. न. भू. क्र. ३५५२ व ३५५४ या मिळकतीवर मुस्लिम दफनभूमी, शिया मुस्लिम दफनभूमी, ख्रिश्चन दफनभूमी व हिंदू स्मशानभूमी विकसीत करणेबाबत दिनांक ११/०८/२०२५ रोजीच्या बैठकीत झालेल्या चर्चेअंती मा. मंत्री (महसूल) यांनी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना आपल्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह शासनास अहवाल सादर करण्यासाठी मा. मंत्री (महसूल) यांनी कार्यवाही करण्याचे निर्देश दिले असणे, परंतु आजतागायत शासनास अहवाल सादर करण्यात आलेला नसणे, परिणामी दफनभूमी व स्मशानभूमीच्या विकास कामांना विलंब होत असणे, त्यामुळे सदरील काम म.न.पा.कडून सुरु करण्यात न येणे, एका वर्षाच्या आत नवीन मृतदेह दफनभूमीत आले तर जुने मृतदेह योग्यरित्या कुजलेले नसल्याचे आढळून येणे, याकरीता अंबोजवाडी येथे नवीन |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | दफनभूमी व स्मशानभूमीची मागणी होत असणे, परिणामी येथील जनतेत पसरलेले असंतोषाचे व नाराजीची भावना, याबाबत महसूल विभागाने तातडीने निर्णय घेऊन लवकरात लवकर शासनाला दफनभूमी व स्मशानभूमीच्या विकासाचे काम करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : २९ जून, २०२६**

**डॉ. विलास आठवले,**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) नगर विकास विभाग
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई